## 9. मार्गदर्शक तत्त्वे
## भाग IV कलम 36 ते 51

- 1928 च्या नेहरु अहवालामध्ये भारतासाठी स्वराज्य घटनेची तरतूद होती. त्यात मूलभूत हक्क समाविष्ट करण्यात आले उदा. - प्राथमिक शिक्षणाचा हक्क
- 1945 च्या तेज बहादूर सप्रू समितीच्या अहवालामध्ये मूलभूत हक्कांचे दोन स्पष्ट गटांत विभाजन आले : न्यायप्रविष्ट आणि गैरन्यायप्रविष्ट.
- सर बी. एन. राव हे संविधान सभेचे घटनात्मक सल्लागार यांनी वैयक्तिक हक्क दोन गटात विभागण्यात यावे, जे न्यायप्रविष्ठ असतील असा सल्ला दिला.
- घटनाकर्त्यांनी ही मार्गदर्शक तत्व 1937 च्या आयरिश घटनेवरुन स्विकारली आहे. [आयरिश घटनेत ती स्पॅनिश कडून स्विकारली]

**मार्गदर्शक तत्वांची वैशिष्ट्ये :-**

- मार्गदर्शक तत्त्वे 1935 च्या कायदयातील सूचनापत्रे याप्रमाणेच आहेत.
- ही तत्त्वे 'पोलीस राज्य' च्या जागी कल्याणकारी राज्य च्या संकल्पनेला मूर्त रुप देण्याचा प्रयत्न करतात.
- मार्गदर्शक तत्त्वे ही न्यायप्रविष्ठ नाहीत.
- सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित करतात.

**मार्गदर्शक तत्त्वाचे वर्गीकरण -**

1) सामाजिक - कलम 45, 46, 47, 48, 49
2) आर्थिक - कलम 38, 39, 41, 42, 43
3) राजकीय - कलम 40, 44, 50
4) आंतरराष्ट्रीय - कलम 51

- **कलम 36** - व्याख्या.
- **कलम 37** - या भागात असलेली तत्त्वे लागू करणे, भाग 4 आहेत. उदा. सामाजिक, आर्थिक, राजकीय व आंतरराष्ट्रीय
- **कलम 38** - राज्याने लोककल्याण संवर्धनासाठी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे.
- **कलम 38 (1)** - सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायानेयुक्त समाजाची निर्मिती.
- **कलम 38 (2)** - उत्पादन, दर्जा, संधी व सुविधा याबाबतची विषमता नष्ट करणे.
- **कलम 39** - राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विशिष्ट तत्त्वे :
- **कलम 39 a** - स्त्री आणि पुरुषांना उत्पादनाची समान साधने उपलब्ध करुन देणे.
- **कलम 39 b** - भौतिक सुविधांचे समतामुल्य वितरण करणे.
- **कलम 39 c** - संपत्ती आणि उत्पादन यांचे केंद्रीकरण नको.
- **कलम 39 d** - स्त्री व पुरुषांना समान कामासाठी समान वेतन.
- **कलम 39 e** - कामगार व बालके यांच्या आरोग्याला हानीकरक नसेल असा रोजगार मिळवून देणे.
- **कलम 39 f** - बालकांना मुक्त व प्रतिष्ठापूर्वक वातावरणात विकसित होण्याची संधी व सुविधा मिळवून देणे.
- **कलम 39 A** - समान न्याय व कायदेविषयक मोफत सहाय्य
- **कलम 40** - ग्रामपंचायतीचे संघटन
- **कलम 41** - कामाचा, शिक्षणाचा व विशिष्ट बाबतीत सार्वजनिक सहाय्याचा अधिकार.
- **कलम 42** - कामाची न्याय्य व मानवीय स्थिती व प्रसूती सहाय्य यांसाठी तरतूद.
- **कलम 43** - कामगारांना निर्वाह वेतन इत्यादी.
- **कलम 43 A** - उदयोगधंदयांच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग.
- **कलम 43 B** - सहकारी सोसायट्यांना प्रोत्साहन - मार्गदर्शक तत्व 97 वा घटनादुरुस्ती कायदा 2011 अन्वये घटनेत समावेश.
- **कलम 44** - नागरिकांना एकरुप नागरी संहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.
- **कलम 45** - 0 ते 6 वर्षाखालील बालकांचे संगोपन व शिक्षणाची तरतूद.
- **कलम 46** - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हित संवर्धन.
- **कलम 47** - पोषणमान व राहणीमान उंचावणे व सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य.
- **कलम 48** - कृषि व पशूसंवर्धन यांचे संघटन.
- **कलम 48 A** - पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन आणि वने व वन्य जीवांचे रक्षण करणे.
- **कलम 49** - राष्ट्रीय महत्वाची स्मारके व स्थान आणि वास्तु यांचे संरक्षण.
- **कलम 50** - न्यायव्यवस्था कार्यकारी व्यवस्थेपासून अलग ठेवणे.
- **कलम 51** - आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन.
- **कलम 51 a** - आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षीतता आबाधित ठेवणे.
- **कलम 51 b** - राष्ट्रा-राष्ट्रांत संबंध प्रस्थापित करणे.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- **कलम 51 c -** आंतरराष्ट्रीय करार व कायदा यांच्या बद्दल आदर बाळगणे.
- **कलम 51 d -** आंतरराष्ट्रीय वाद-विवाद वाटाघाटीच्या माध्यमातून सोडविणे.

**घटनेत समाविष्ट केलेले नवीन मार्गदर्शक तत्त्वे -**

- 42 वी घटनादुरुस्तीने (1976) मूळ तत्त्वांच्या यादीमध्ये चार नवीन मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट केली : कलम 39 (f), कलम 39A, कलम 43 A व कलम 48 A
- 44 व्या घटनादुरुस्तीने (1978) कलम 38 (2) हे तत्त्व समाविष्ट केले.
- 86 व्या घटनादुरुस्तीने (2002) कलम 45 ची वाक्यरचना बदलवली व राज्यावर 6 वर्षाखालील बालकांचे संगोपन व शिक्षणासाठी तरतूद करण्याची जबाबदारी टाळण्यात आली. त्याच घटनादुरुस्तीने कलम 21A हे कलम घटनेत समाविष्ट करुन प्रा. शिक्षण हा मूलभूत हक्क बनविला.
- अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांच्या मते, लोकांना जबाबदार असलेले कोणतेही मंत्रीमंडळ घटनेच्या भाग 4 मधील तरतुदीकडे दूर्लक्ष करु शकत नाही.

**भाग IV च्या बाहेरील मार्गदर्शक तत्त्वे**

- **कलम 335 (भाग XVI) -** सेवा व पदे यांवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे हक्क.
- **कलम 350 A - (भाग XVII) -** प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणाच्या सोयी.
- **कलम 351 - (भाग XVII)-**हिंदी भाषेच्या विकासासाठी मार्गदर्शक तत्त्व.

**मार्गदर्शक तत्त्वाबाबतचे अभिप्राय :-**

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर :** आगळे-वेगळे व नाविण्यपूर्ण वैशिष्ट्ये.
- **एन. एम. सिंगवी :** मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे घटनेला जीवन प्रदान करणाऱ्या तरतुदी आहेत.
- **एम. सी. छगला :** जर या सर्व तत्त्वांची पूर्ण अंमलबजावणी करण्यात आली तर देश पृथ्वीवरील स्वर्ग बनेल.
- **बी. एन. राव :** मार्गदर्शक तत्त्वे ही राज्यसंस्थेच्या प्राधिकारांसाठी नैतिक तत्त्वे आहेत. त्यांच्यात किमान शैक्षणिक मूल्य आहे.
- **के.व्ही. राव :** मार्गदर्शक तत्त्वाचा खरा हेतू भारताला पोलीस राज्य नव्हे तर कल्याणकारी राज्य बनविण्याचा आहे.
- **एम.सी. सेटलवाड :** न्यायालयास उपयुक्त व प्रस्ताविकेचा विस्तार करणारे तत्त्वे.

**मार्गदर्शक तत्त्वांवरील टिका**

- **के. संथानम :** या तत्त्वांनी 1) केंद्र व राज्ये 2) राष्ट्रपती व पंतप्रधान 3) राज्यपाल व मुख्यमंत्री यांमध्ये घटनात्मक संघर्ष निर्माण केला आहे.
- **के.टी. शहा :** बँकेच्या सोयीनुसार वटविता येणारा चेक.
- **टी.टी. कृष्णामाचारी :** भावनाची खरी केराची टोपली.
- **नसिरोद्दीन :** नववर्षाचा निश्चय जो 2 जानेवारीला मोडला जातो.
- **के.सी. व्हेअर :** कंटाळवाणा नैतिक उपदेश.

**मार्गदर्शक तत्त्वांबाबतचे सर्वोच्च न्यायालयातील खटले :-**

- **1994 - एस.आर. बोम्मई विरुद्ध भारतीय संघराज्य -**
धर्म ही बाब व्यक्तीच्या खाजगी श्रद्धाशी संबंधित असून तीची ऐहिक कृतीसोबत सरमिसळ करून राज्यसंस्थेने याबाबत कायदा करून ऐहिक कृतीचे नियमन करावे.
- **1995 - सरला मुदगल विरुद्ध भारतीय संघराज्य -**
एखाद्या हिंदू मुसलमान झाल्यामुळे त्याच्या हिंदू पत्नी व मुलाला असलेले अधिकार संपुष्टात येत नाही. त्याने दुसरे लग्न केल्यास त्याच्या विरूद्ध फिर्याद करण्याचा त्याच्या पत्नीला अधिकार आहे.
- **2000 - लिलि थॉमस विरुद्ध भारतीय संघराज्य -**
एका व्यक्तीला आपल्या धर्म स्वातंत्र्याच्या नावाखाली दुसऱ्याच्या धर्मस्वातंत्र्यावर आक्रमण करण्याचा अधिकार नाही.
- **2003 - जॉन वल्लामॅथम विरुद्ध भारतीय संघराज्य -**
राज्यघटनने कलम 25 आणि 26 हमी दिलेल्या हक्कातंर्गत विवाह वारसा यासारख्या ऐहिक गोष्टी चा मुलभूत हक्काबाबत संबंध आणू नये.